क्र. १४५ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

२१ मे २०२३

## पुनरुत्थानानंतरचा सातवा रविवार प्रभूचे स्वर्गारोहण

### प्रस्तावना

आज येशूच्या स्वर्गरोहणाच्या सणाचा रविवार. ज्या ख्रिस्तावर आपण आपली सारी भिस्त ठेवतो तो ख्रिस्त देवाचा पुत्र आहे. तो पित्याकडून आला व पित्याकडे स्वर्गात गेला या आपल्या धर्मसत्याची जाणीव आपण स्वत:ला कायमची करून दिली पाहिजे. जेथे ख्रिस्त आहे तिथे त्याच्याच सहवासात ख्रिस्तीजन असणार हेही तितकेच खरे आहे. त्याच्या सहवासात आपण सर्वांनी असावे. त्याने आखून दिलेल्या मार्गाने जाण्यास तयार व्हावे म्हणून आपण आजच्या मिस्साबलीत विशेष प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्‍वरा, आमच्या स्वर्गीय बापा, तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याच्या स्वर्गारोहणाचा हा सण आनंदाने साजरा करण्यास आम्हांला साहाय्य कर. त्याचे स्वर्गारोहण आमच्या भावी वैभवाचे व आशेचे चिन्ह आहे. त्याच्या ह्या नवनिर्मितीत आमचा समावेश कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर तुझा पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन १:१-११**

**''त्यांच्या डोळ्यांदेखत येशू वर घेतला गेला.''**

हे थियफिला, येशूने जे प्रेषित निवडले होते त्यांस पवित्र आत्म्याच्याद्वारे आज्ञा केल्यानंतर तो वर घेतला गेला. त्या दिवसांपर्यंत त्याने जे जे करावयास आणि शिकवावयास आरंभिले होते. त्या सर्वांविषयी मी पहिल्या ग्रंथात लिहिले होते. मरण सोसल्यानंतरही त्याने त्यांस पुष्कळ प्रमाणांनी आपण जिवंत आहो हे दाखवले. चाळीस दिवसापर्यंत येशू त्यांस दर्शन देत असे आणि देवाच्या राज्याच्या गोष्टी सांगत असे. तो आणि ते एकत्र जमले असताना त्याने त्यांस आज्ञा केली की, यरुशलेम सोडून जाऊ नका, तर पित्याने देऊ केलेल्या ज्या देणगीविषयी तुम्ही माझ्याकडून ऐकले आहे तिची वाट पाहा. कारण योहानने पाण्याने बाप्तिस्मा केला खरा, पण तुमचा बाप्तिस्मा थोड्या दिवसांनी पवित्र आत्म्याने होईल.

ते एकत्र असताना त्यांनी त्याला विचारले, ''प्रभो, ह्याच काळात तुम्ही इस्राएलचे राज्य पुन्हा स्थापित करणार काय?'' तो त्यांस म्हणाला, ''जो काळ आणि समय पित्याने स्वतःच्या अधिकारात ठेवला आहे ते जाणणे तुम्हांकडे नाही. परंतु पवित्र आत्मा तुम्हांवर येईल तेव्हा तुम्हांस सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरुशलेमात, सर्व यहुदियात , शोमरोनात आणि पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल.'' असे सांगितल्यावर त्यांच्या डोळ्यांदेखत तो वर घेतला गेला आणि मेघाने त्याला त्यांच्या दृष्टीआड केले, तो जात असता ते आकाशाकडे निरखून पाहात होते, तेव्हा पाहा, शुभ्र वस्त्र परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे राहिले. ते म्हणाले, ''अहो गालीलकरांनो, तुम्ही आकाशाकडे का पाहात उभे राहिला ? हा जो येशू तुम्हांपासून वर आकाशात घेतला गेला आहे तोच, तुम्ही त्याला जसे आकाशात जाताना पाहिले, तसाच येईल.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

४६:२-३, ६-७, ८-९

प्रतिसाद : **जयघोष होत असता देव वर गेला आहे.**

१. अहो सर्व लोकहो, टाळ्या वाजवा. उत्साहशब्दांनी देवाचा जयजयकार करा!. कारण परमेश्वर परात्पर आणि भयप्रद आहे. तो अखिल पृथ्वीचा महान सार्वभौम राजा आहे.

२. जयघोष होत असता देव वर गेला आहे. कर्ण्याचा शब्द होत असता परमेश्वर वर गेला आहे. देवाची स्तुतीस्तोत्रे गा; आमच्या राजाची स्तुतीस्तोत्रे गा.

३. देव सर्व पृथ्वीचा राजा आहे, तुम्ही लक्षपूर्वक त्याची स्तुतीस्तोत्रे गा. देव राष्ट्रांवर राज्य करीत आहे; देव आपल्या पवित्र सिंहासनावर बसला आहे.

### दुसरे वाचन

**पौलचे इफिसकरांस पत्र यातून घेतलेले वाचन १:१७-२३**

**''परमेश्वराने येशूला स्वर्गात आपल्या उजवीकडे बसवले.''**

आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा देव जो वैभवशाली पिता, ह्याने तुम्हाला आपल्या ओळखीसंबंधीच्या ज्ञानाचा आणि प्रगटीकरणाचा आत्मा द्यावा. म्हणजे त्यामुळे तुमचे अंतःचक्षू प्रकाशित होऊन त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती, पवित्र जनांमध्ये त्याने दिलेल्या वतनाच्या वैभवाची समृध्दी केवढी आणि जे आपण विश्वास ठेवणारे त्या आपणांविषयीच्या त्याच्या सामर्थ्याने अपार महत्व ते काय हे तुम्ही त्याच्या बलशाली पराक्रमाच्या कृतीवरुन ओळखून घ्यावे. त्याने तीच कृती ख्रिस्ताच्या ठायी दाखवून त्याला मेलेल्यातून उठवले आणि सर्व सत्ता, अधिकार, सामर्थ्य, धनीपणा, सांप्रत आणि भावी युगातील कोणतेही नाव घ्या, त्या सर्वाहून त्याला उंच करुन स्वर्गात आपल्या उजवीकडे बसवले. त्याने सर्व काही त्याच्या पायाखाली ठेवले आणि त्याने सर्वांवर मस्तक व्हावे असे म्हणून त्यास मंडळीला दिले. हीच मंडळी त्याचे शरीर होय. हिच्याद्वारे तो आपले कार्य सर्वत्र आणि सर्वप्रकारे पुरे करतो.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय २८: १९. २०**

**आलेलुया, आलेलुया!**

तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.

**आलेलुया!**

## शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २८:१६-२०**

**"स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे."**

अकरा शिष्य गालीलात जो डोंगर येशूने सांगून ठेवला होता त्यावर गेले आणि त्यांनी येशूला तेथे पाहून नमन केले. तरी कित्येकांस संशय वाटला. तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला, "स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. ह्यास्तव तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा. त्यांस पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या : तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल - **प्रार्थना करते है, वंदना करते है. (गायनात)**

१. आपले पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स व ब्रदर्स ह्यांच्या सेवेद्वारे ख्रिस्ताची ओळख पटवून घ्यावी म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपल्या देशात व जगात सत्याचे, न्यायाचे व शांतीचे राज्य प्रस्थापित व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. परमेश्वराचे वचन ऐकण्यास व त्याची शिकवणूक आत्मसात करून आपल्या अंत:करणात प्रभूच्या शब्दाचा अंकूर वाढावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आजारी असलेल्या सर्वांना प्रभूच्या आरोग्यदायी स्पर्शाची अनुभूती यावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तुझा पुत्र ख्रिस्त याच्या स्वर्गारोहणाची स्मृती आम्ही आज साजरी करीत आहोत. या पवित्र दिवशी आमच्या भेटीचा स्वीकार कर आणि ख्रिस्ताबरोबर पुन्हा उठण्यासाठी व स्वर्गीय आनंदात सहभागी होण्यासाठी आम्हाला कृपादान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ बापा, या ख्रिस्तप्रसादाद्वारे तुझ्या दैवी जीवनात तू आम्हाला सहभागी करतोस. ख्रिस्ताचे भक्तीपूर्वक अनुकरण करण्यास व शाश्वत जीवन प्राप्त करुन घेण्यास आम्हास साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो,

## चिंतन

आजच्या उपासनेतील सर्व वाचने (प्रे.कृ.१:१-११; इफिस.१:१७-२३; मत्तय २८:१६-२०) स्वर्गात चढणाऱ्या येशूने आपल्यावर सोपविलेल्या महान मिशनकार्याची जाणीव करून देतात. हे मिशन कार्य करताना प्रेषितांनी कोणकोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात ते येशू शिकवितो :

**अ) येशूचा अधिकार :** स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार येशूला देण्यात आलेला आहे. त्याच्या प्रेषितकार्यात येशूने पृथ्वीवरील, निसर्गातील, आजारावरील, व्यंगांवरील, भूत-पिशाच्चावरील, मरणावरील व सर्व दु:खावरील अधिकार प्रकट केलेला होता. त्याच्या जन्माच्यावेळी देवदूतांनी गायन केलेले होते. त्याच्या मरणाच्यावेळी मृत माणसे जिवंत होऊन पवित्र भूमीत गेलेली होती. पुनरुत्थानसमयी स्वर्गातून देवदूत उतरला होता. आता त्याच्या स्वर्गारोहणाद्वारे येशू स्वर्गातील व पृथ्वीवरील आपला अधिकार अधोरेखित करतो.

**ब) शिष्यांचे प्रेषितकार्य :** मत्तयच्या शुभवर्तमानात येशू सुरुवातीला आपले प्रेषितकार्य इस्राएलपुरता मर्यादित ठेवतो (१५:२८). प्रेषितांनादेखील तो केवळ इस्राएलच्या हरवलेल्या मेंढरांकडे पाठवतो (१०:५). मात्र त्याच्या स्वर्गारोहणाच्यावेळी तो शिष्यांचे प्रेषितकार्य व्यापक करतो. सर्व राष्ट्रांना शिष्य करून त्यांना आत्ता आपले प्रेषितकार्य पुढे सुरू ठेवायचे आहे.

**क) पवित्र त्रैक्याचा बाप्तिस्मा :** बाप्तिस्माँ ह्या ग्रीक शब्दाचा अर्थ बुडवून काढणे. प्रेषितांनी आता सर्वांना देवपित्याच्या प्रेमात, देवपुत्राच्या कृपेत आणि पवित्र आत्म्याच्या एकोप्यात सहभागी करून घ्यावे अशी आज्ञा येशू देतो.

**ड) आज्ञापालनाची शिकवण :** एक उत्तम गुरू म्हणून येशूने लोकसमुदायाला शिकवलेले होते. काही गोष्टी एकांती त्याने प्रेषितांना समजून सांगितलेल्या होत्या. आता येशू त्यांना इतरांना शिकविण्याची आज्ञा करतो. शिष्यांना एकाचवेळी शिक्षक आणि विद्यार्थी ह्या दोन्ही भूमिका पार पाडायच्या आहेत.

इ) येशूची अखंड उपस्थिती : केवळ मत्तयच्या शुभवर्तमानात "इम्मानुएल (आम्हाबरोबर देव)" (१:२३) "जिथे दोघे किंवा तिघे माझ्या नावाने एकत्र जमतील तिथे मी त्यांच्यात हजर आहे"(१८:२०) अशा शब्दात येशूमधील देवाच्या उपस्थितीचे सूतोवाच करण्यात आले आहे. आत्ता स्वर्गात जाण्यापूर्वी येशू "मी युगाच्या समाप्तीपर्यंत सदैव तुमच्याबरोबर आहे" असे वचन देतो.

**आत्मपरीक्षण :** वरीलपैकी कोणता पैलू मला अधिक स्पर्शून जातो? तो मी कशाप्रकारे कृतीत उतरविणार आहे?

●●●

| मे २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | | तिसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम २२ | कॅशियाची सं रिटा (पां) | : प्रे.कृ.१९: १-८/योहान १६: २९-३३ | |
| मंगळ २३ | सं जॉन बॅप्टिस्ट डी रॉस्सी (पां) | : प्रे.कृ.२०:१७-२७/योहान १७:१-११ | |
| बुध २४ | मेरी हेल्प ऑफ ख्रिश्चन्स सण (पां) | : प्रे.कृ.२०:२८-३८/योहान १७:११-१९ | |
| गुरु २५ | सं बीडे (पां) | : प्रे.कृ.२२:६-११/योहान १७: २०-२६ | |
| शुक्र २६ | सं फिलीप नेरी (पां) | : प्रे.कृ.२५:१३-२१/योहान २१:१५-१९ | |
| शनि २७ | कँटरबरीचे सं अगस्तीन (पां) | : प्रे.कृ.२८: १६-२०, ३०,३१/योहान २१:२०-२५ | |